केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700


RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN


राजमोती RAJ MOTI साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

Volume - 74 | Issue- 259 | Marathi Daily | Friday 26/6/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3

चांदीमधील चैन, ब्रासलेट, अंगठी, पेंडन्टच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन्स

चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी
₹ ९९९/-*
Conditions Apply*

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



'सोशल मीडियावर खोट्या संदर्भाचे व्हिडीओज व अफवा पसरवणाऱ्या बातम्या पोस्ट करणाऱ्या व्यक्तींना घाम फुटेल' अशा प्रकारच्या शिक्षा सुचवताहेत ते शासनाला !

### पोलिसांकडून मिरवणुकीदरम्यान मोठा बंदोबस्त

# सायंकाळी मोहरम विसर्जन मिरवणूक

**समाचार/नगर-दि.२६**

गुरूवारी रात्री किरकोळ प्रकार वगळता कत्तल की रात मिरवणूक शांततेत पार पडली. दरम्यान, आज (शुक्रवार) दुपारनंतर मोहरम विसर्जन मिरवणुकीस सुरूवात होणार आहे. या मिरवणुकीदरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचे मिरवणुकीवर बारीक्ष लक्ष राहणार असून तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

शहरातील बारा इमाम कोठला येथे मोहरमच्या नऊव्या दिवशी गुरुवारी मध्यरात्री (कत्तलच्या रात्री) इमाम हुसेन यांची सवारी उठविण्यात आली. त्यानंतर हवेली येथे इमाम हसन यांची सवारी उठविण्यात आली. यावेळी दोन्ही सवारींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी पारंपारिक टेंभे पेटविण्यात आले होते. दरम्यान, सवारी घेण्यावरून गोंधळ उडाल्याने काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. कत्तल की रात मिरवणूक शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजेपर्यंत सुरू होती. यावेळी युवकांची मोठी गर्दी होती. दरम्यान, दुपारनंतर मोहरम विसर्जन मिरवणुकीस सुरूवात होणार आहे. कोठला येथून मोहरम विसर्जन मिरवणुकीस सुरवात होणार आहे. दाळमंडई, पिंजारगल्ली, पारशा खुंट, कापडबाजार, बांबु गल्ली, पंचपीर चावडी, जुनी महापालिका कार्यालय, जुने कोर्ट गल्ली, दिल्लीगेट मार्गे ही मिरवणूक जाणार आहे. मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दोन दिवसांपूर्वीच



(छाया - वाजिद शेख)

बुलेटवरून मिरवणूक मार्गाची पाहणी केली होती. तसेच मिरवणूक मार्गावर पोलिसांनी संचलन देखील केले होते.

### ऑपरेशन सिन्दूर' मोहिमेत हौतात्म्य...

## 'त्या' ६ जवानांची नावे प्रथमच आली समोर; वीरता पुरस्काराने गौरव

**समाचार/नवी दिल्ली-दि.२६**

'ऑपरेशन सिन्दुर' मध्ये भारतीय जवानांनी भीमपराक्रम गाजवत पाकिस्तानला त्यांची जागा दाखवून दिली. या मोहिमेत भारतीय जवानांसमोर पाकिस्तानने अक्षरश: गुडघे टेकले आणि शस्त्रसंधीची भीक मागितली. या 'ऑपरेशन सिन्दुर' मोहिमेत आपल्या पराक्रमाची शर्थ करणाऱ्या ६ भारतीय जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले. या जवानाचा नावे पहिल्यांदाच समोर आली असून या जवानांना वीरता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

'ऑपरेशन सिन्दुर' मध्ये भारताने पाकिस्तानात घुसून त्यांचे दहशतवादी तळ उध्वस्त केले होते. त्यानंतर घाबरलेल्या पाकिस्तानने भारताकडे शस्त्रसंधीची मागणी केली. या मेहिमेत भारताच्या सहा जवानांना हौतात्म्य आले. या जवानांची नावे पहिल्यांदाच सार्वजनिक करण्यात आली आहेत. या जवानांना राष्ट्पती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वीरता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या या जवानांमध्ये सुभेदार मेजर पवनकुमार, रायफल ारप सुनीलकुमार, लान्स नायक दिनेशकुमार,, अग्निवर मुरली नायक, सार्जंट सुरेंद्रकुमार, हवालदार सुनीलकुमार सिंह यांचा समावेश आहे. राष्ट्पती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते

रायफल ारप सुनीलकुमार यांना मरणोत्तर वीरचक्र, सार्जंट सुरेंद्रकुमार यांना वायू पदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

## निवडक

### उदय सामंत यांची वडेट्टीवार यांना ऑफर



**मुंबई, दि. २६–** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाकडून सुरू असलेल्या राजकीय खेळींमुळे विरोधकांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. ठाकरे गटाच्या ६ खासदारांच्या यशस्वी पक्षांतरानंतर आता शिंदे गटाने आपला मोर्चा थेट काँग्रेसच्या गोटात वळवला आहे. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काँग्रेसचे दिग्गज नेते विजय वडेट्टीवार यांना जाहीरपणे शिवसेनेत येण्याचे निमंत्रण दिले आहे. वडेट्टीवार यांच्यासारखा लोकांशी नाळ जुळलेला ताकदीचा नेता पक्षात आला, तर आपल्याला सर्वाधिक आनंद होईल, असे सूचक वक्तव्य सामंत यांनी केले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार हे शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, विजय वडेट्टीवार हे आमचे अतिशय चांगले मित्र आहेत. एकनाथ शिंदे यांचे देखील ते जवळचे मित्र आहेत. पक्ष प्रवेशाच्या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी आमच्याशी कधीही चर्चा केली नाही. पण विजय वडेट्टीवार यांच्या सारखा विदर्भातील एक ताकदीचा नेता, लोकांमधील नेता ज्याची नाळ लोकांशी जुळलेली आहे. त्यांनी जर एकनाथ शिंदे यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला तर सगळ्यात जास्त आनंद मला होईल. कारण मी विजय वडेट्टीवार यांच्यासोबत देखील काम केलेले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने अभिवादन



**समाचार/नगर-दि.२६**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्वादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना रा. काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांनी अवघ्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात १२० हून अधिक लढाया लढल्या आणि एकही युद्ध न हरता मोगल सत्तेला समर्थपणे रोखून धरले. त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व, असामान्य विद्वत्ता आणि हिंदू धर्मावरील अखंड निष्ठेमुळे त्यांना धर्मवीर' ही गौरवपूर्ण उपाधी मिळाली.धर्मवीर संभाजी महाराजांचे जीवन हे शौर्य, त्याग, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमानाचे जिवंत उदाहरण असून आजच्या युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, महेश तवले, रेवन्नाथ पवार, मयूर बांगरे, गोरख पडोळे, सुरज कोतकर, जॉय लोखंडे, सुरत शिंदे, नितीन घोडके, तुषार यादव, मारुती पवार, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, भाऊ बारस्कर, सचिन पवार, रवी दंडी उपस्थित होते.

### महायुतीची सत्ता असताना अमली पदार्थांचा सुळसुळाट चिंताजनक

# जबाबदारी झटकून आंदोलन करणे दुटप्पीपणा-दीप चव्हाण

**समाचार/नगर-दि.२६**

शहर व जिल्ह्यात अमली पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याबाबत व्यक्त होत असलेली चिंता अत्यंत गंभीर असून युवकांचे भवितव्य उध्दवस्त करणाऱ्या या प्रवृत्तीवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यात, शहरात आणि महापालिकेत सत्ताधारी असलेल्या महायुतीतील घटक पक्षांनीच याबाबत आंदोलनाची भूमिका घेणे म्हणजे जनतेची दिशाभूल करण्याचा प्रकार



असल्याची टीका शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दीप चव्हाण यांनी केली आहे. नगर शहरात महायुतीची सत्ता आहे. पालकमंत्री भाजपाचे आहेत. महापालिकेत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांचे बहुमत आहे. राज्यातही महायुतीचे सरकार सत्तेत आहे. असे असताना शहरातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडत असेल, अमली पदार्थांची विक्री खुलेआम होत असेल, गुन्हेगारी वाढत असेल तर त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होतो, असे दीप चव्हाण म्हणाले.

महायुतीच्या नेत्यांनी पोलिस प्रशासनावर दोषारोप करून आंदोलन करण्यापेक्षा स्वतः च्या कारभाराचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सत्ता आपल्या हातात असताना परिस्थिती नियंत्रणात आणण्यात अपयश आले आणि त्यानंतर त्याच विषयावर आंदोलन करून राजकीय श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे हे जनतेला न पटणारे आहे. नगर मधीलच तरुण कसे नशेच्या आहारी मोठ्या संख्येने जात आहेत ? त्यामागची मूळ कारणे काय आहेत. असे प्रश्न विचारत दीप चव्हाण यांनी म्हटले आहे की, पूर्वाश्रमीचे काँग्रेस **(पान ३ वर)**

## डिजिटल फसवणुकीच्या नुकसानीत भारतीय ग्राहक अग्रेसर

**नवी दिल्ली, दि.२६–** भारतामध्ये डिजिटल व्यवहारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ऑनलाईन बँकिंग, यूपीआय, क्रेडिट कार्ड, ई-कॉमर्स आणि मोबाईल वॉलेटच्या वापरामुळे आर्थिक व्यवहार अधिक सोपे झाले आहेत. मात्र, या डिजिटल क्रांतीसोबत सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. विविध आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार डिजिटल फसवणुकीमुळे होणारे भारतीय ग्राहकांचे आर्थिक नुकसान जागतिक सरासरीपेक्षा सुमारे ३६ टक्के अधिक आहे. ही बाब ग्राहक, बँका आणि सरकारी यंत्रणांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

भारतात डिजिटल व्यवहारांची संख्या मोठी असून नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार वेगाने होत आहे. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत लाखो लोक ऑनलाईन व्यवहार करत आहेत. मात्र, अनेक ग्राहकांना सायबर सुरक्षेचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे फसवणूक करणाऱ्यांना संधी मिळते. बनावट फोन




कॉल, खोटे बँक अधिकारी, केवायसी अपडेटच्या नावाखाली माहिती मागवणे, फिशिंग लिंक, बनावट क्यूआर कोड आणि सोशल मीडियावरील खोट्या जाहिराती हे फसवणुकीचे प्रमुख प्रकार आहेत. सायबर गुन्हेगार सतत नवे मार्ग शोधत असतात. अनेकदा ग्राहकांना मोबाईलवर एखादी लिंक पाठवली जाते आणि त्यावर क्लिक करताच त्यांच्या बँक खात्याची किंवा कार्डची माहिती चोरली जाते. काही वेळा नोकरी, गुंतवणूक किंवा ऑनलाईन खरेदीच्या आमिषाने लोकांची फसवणूक केली जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून बनावट आवाज किंवा व्हिडीओ तयार करण्याचे प्रकारही वाढत आहेत, त्यामुळे फसवणूक अधिक विश्वासार्ह वाटते.

ग्राहकांनीही काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला ओटीपी, पिन, सीव्हीव्ही, पासवर्ड किंवा बँक खात्याची माहिती देऊ नये. संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये किंवा अनोळखी प डाउनलोड करू नयेत. क्यूआर कोड स्कॅन करण्यापूर्वी त्याची खात्री करावी.

बँक खात्याचे व्यवहार नियमित तपासावेत आणि फसवणुकीचा संशय आल्यास त्वरित बँकेला व संबंधित यंत्रणांना माहिती द्यावी. डिजिटल व्यवहार हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे साधन बनले असले, तरी त्यांचा वापर करताना सतर्क राहणे तितकेच गरजेचे आहे. वाढत्या सायबर धोक्यांच्या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाबरोबरच ग्राहकांची जागरूकता हीच सर्वात प्रभावी सुरक्षा ठरू शकते. सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारल्यास आर्थिक नुकसान टाळता येईल आणि डिजिटल भारताची वाटचाल अधिक विश्वासार्ह बनू शकेल.

**रो-बंगले विकणे**
बोल्हेगाव, नगर येथे सर्व सुविधांयुक्त उत्तम लोकेशन, क्वॉलिटी व रेडी पझेशनचे
1 BHK व 1 R K
नवीन रो-बंगले विकणे आहे.
- संपर्क -
9273448462

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे
अध्यक्ष शिरीष मोडक सर यांना
भावपूर्ण आदरांजली

स्व. शिरीष मोडक सर
सर, आपले विचार, कार्य आणि मार्गदर्शन आमच्यासाठी कायम प्रेरणादायी आहे. आपल्या स्मृतीस विनम्र आदरांजली
- दुःखांकित -
पदाधिकारी, संचालक, कर्मचारी व सर्व वाचक सभासद,
अहिल्यानगर जिल्हा वाचनालय, अहिल्यानगर

संपादकीय

# पुन्हा चर्चेत सीबीआयची विश्वासार्हता

अलिकडच्या काळातील घटना पाहता 'सीबीआय'ला निवडणूक आयोग किंवा नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या धर्तीवर एक पूर्णपणे स्वायत्त आणि संवैधानिक संस्था बनवले पाहिजे. त्यासाठी संसदेत एक विशेष कायदा संमत केला जाणे आवश्यक आहे. 'सीबीआय'च्या प्रमुखांची नियुक्ती आणि कार्यकाळ हा कोणत्याही राजकीय प्रभावापासून मुक्त असणाऱ्या एका उच्चस्तरीय आणि निष्पक्ष समितीद्वारे निश्चित केला गेला पाहिजे. त्यात सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीशांची भूमिका निर्णायक असावी. यासोबतच 'सीबीआय'च्या अंतर्गत कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे. तपासातील त्रुटी दूर करण्यासाठी अधिकाऱ्यांना आधुनिक न्यायवैद्यक विज्ञान, सायबर सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक गुन्ह्यांच्या तपासाचे प्रगत प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रत्येक अयशस्वी खटल्याचे अंतर्गत ऑडिट झाले पाहिजे आणि पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड खटल्यासारख्या प्रकरणात ज्या अधिकाऱ्यांच्या ढिसाळपणामुळे किंवा त्रुटींमुळे तपास भरकटला आणि खटला न्यायालयात टिकू शकला नाही, त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित केले जात नाही, तोपर्यंत न्यायालयांच्या ताशेऱ्यांचा त्यांच्यावर काहीही परिणाम होणार नाही. पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणी देण्यात आलेल्या निकालात पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्तता करण्यात आली. न्यायालयाने हा निकाल देताना केवळ आरोपींना निर्दोष मुक्त केले नाही, तर तपास यंत्रणांच्या विशेषतः सीबीआयच्या तपास पद्धतीवर अत्यंत कठोर शब्दांमध्ये ताशेरे ओढले. न्यायालयाने नमूद केलेल्या त्रुटी इतक्या मूलभूत आहेत, की त्या केवळ एका खटल्यापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करतात. 'सीबीआय' म्हणजे देशातील सर्वात विश्वासार्ह तपास यंत्रणा, अशी सर्वसामान्यांची धारणा आहे. राज्य पोलिसांवर राजकीय दबावाचा संशय निर्माण झाला, की विरोधक, सामाजिक संस्था, पीडित कुटुंबे आणि अनेकदा न्यायालयेसुद्धा तपास 'सीबीआय'कडे सोपवण्याचा आग्रह धरतात. कारण 'सीबीआय'कडे अधिक प्रशिक्षित अधिकारी, व्यापक अधिकार आणि निष्पक्ष तपासाची अपेक्षा असते; पण गेल्या काही वर्षांमध्ये अनेक गाजलेल्या प्रकरणांमध्ये न्यायालयांनी 'सीबीआय'च्या तपासातील त्रुटींवर वारंवार बोट ठेवले आहे. प्रश्न असा आहे, की देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेकडूनच अशा चुका होत असतील, तर नागरिकांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास कसा ठेवायचा? मोबाईल फोन जप्त न करणे, कॉल डिटेल रेकॉर्ड न मिळवणे, माफीच्या साक्षीदाराच्या कथनातील गंभीर विसंगतींची पडताळणी न करणे, महत्त्वाच्या दाव्यांची चौकशी न करणे, मूळ कागदपत्रांचा उगम शोधण्याची तसदी न घेणे आणि कथित बेकायदेशीर कोठडीसारख्या बाबींकडे दुर्लक्ष करणे अशा या खटल्याप्रसंगी समोर आलेल्या पोलिस तपासातील चुका साध्यासुध्या नाहीत. या त्रुटींमुळे न्यायालयाने संपूर्ण तपासच संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे नमूद केले. परिणामी, आरोपी दोषी आहेत की नाहीत, हा प्रश्न मागे पडला आणि तपास विश्वसनीय आहे की नाही, हा प्रश्न पुढे आला. या निकालावर टीका करण्यापेक्षा तपासात उणिवा का राहिल्या, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे. याच संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने २०१३ मध्ये केलेले निरीक्षण पुन्हा आठवते. कोळसा वाटप प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने 'सीबीआय'ला 'सरकारच्या पिंजऱ्यातील पोपट' अशी उपमा दिली होती. या एका वाक्याने देशातील तपास यंत्रणांच्या स्वायत्ततेपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे केले होते. न्यायालयाचा आशय स्पष्ट होता, 'सीबीआय'ने सत्ताधाऱ्यांच्या इच्छेनुसार नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत राहून स्वतंत्रपणे काम केले पाहिजे. दुर्दैवाने, हे निरीक्षण आजही तितकेच लागू पडते, असे अनेक प्रसंग पहायला मिळतात.न्यायालयाने एखाद्या तपासातील गंभीर त्रुटी निदर्शनास आणल्या, तरी संबंधित अधिकाऱ्यांवर किती वेळा शिस्तभंगाची कारवाई होते? दोषपूर्ण तपासाची जबाबदारी निश्चित केली जाते का? तपासाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी कोणती सुधारणा अंमलात आणली जाते? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे क्वचितच मिळतात. 'सीबीआय'च्या तपासातील त्रुटींचे परिणाम केवळ एका खटल्यापुरते मर्यादित नसतात. दोषी सुटण्याची शक्यता वाढते, निरपराध व्यक्तींवर संशयाची सावली वर्षानुवर्षे राहते, पीडित कुटुंबांचा न्यायावरील विश्वास ढासळतो. न्याय मिळाला नाही, अशी भावना निर्माण होणे हे न्याय न मिळण्याइतकेच धोकादायक असते. आज तंत्रज्ञानाच्या युगात तपासासाठी अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत. मोबाईल लोकेशन, कॉल डिटेल्स, सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक विश्लेषण आणि इलेक्ट्रॉनिक डेटा यामुळे तपास अधिक वैज्ञानिक झाला आहे. या पार्श्वभूमीवर तपास अधिकाऱ्यांना निश्चित कार्यकाळ, राजकीय हस्तक्षेपापासून संरक्षण, आधुनिक फॉरेन्सिक प्रशिक्षण, स्वतंत्र उत्तरदायित्व यंत्रणा आणि दोषपूर्ण तपासासाठी वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे या सुधारणा अत्यावश्यक आहेत. 'सीबीआय' ही भारताची अस्मिता आणि देशातील न्यायव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ आहे. तिला 'पिंजऱ्यातील पोपट' म्हणून राहू देणे देशाच्या हिताचे नाही. 'सीबीआय'च्या अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे, की त्यांची निष्ठा कोणत्याही तात्पुरत्या राजकीय सत्तेशी नसून भारताच्या संविधानाशी आणि कायद्याच्या राज्याशी आहे. केवळ संविधानाला उत्तरदायी राहून, कोणत्याही भीतीशिवाय आणि पक्षापातीपणाशिवाय 'सीबीआय' काम करू लागेल, तेव्हाच तिची हरवलेली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित होईल.

# लोककलावंतांना मानधन वाढवून देण्याची मागणी



**समाचार/नगर-दि.२६**

हिंदवी रेणुराई गोंधळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दशरथ धुमाळ यांनी लोककलावंतांच्या मागण्यांसंदर्भात आमदार संग्राम जगताप यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व मागणीचे निवेदन त्यांच्याकडे सुपूर्द केले. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककलावंतांच्या मागण्या मांडाव्यात, अशी मागणी धुमाळ यांनी केली. पारंपरिक लोककलावंतांची निवड इष्टांक ५०० पाचशे करावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. नगर जिल्हा क्षेत्रफळाने मोठा असल्याने आणि या जिल्ह्यात एकूण १४ तालुके असल्याने कलावंतांची निवड करण्यासाठी इष्टांक ५०० करावा आणि लोककलावंतांच्या मानधनामध्ये वाढ करून ते प्रतिमहा दहा हजार रुपये करावे, असे धुमाळ यांनी निवेदनात म्हटले आहे.

लोककलावंत हे भारतीय संस्कृतीचे रक्षक आहेत. ते शहर, गाव, वाड्या-वस्त्या, तांडे, डोंगर, पहाड आदि सर्वच दुर्गम भागात जातात. पाऊसपाणी, ऊन वा थंडी अशा कोणत्याही ऋतूत ते आपल्या रोजीरोटीसाठी कला सादर करून संस्कृतीचे रक्षण करतात. यामधून त्यांना अत्यंत अल्प मानधन मिळते. त्यामुळे त्यांना शासकीय मदतीची आवश्यकता आहे. याचा सहानुभूतीने विचार करून शासनाने लोककलावंतांना मानधन वाढवून द्यावे, अशी आग्रहाची मागणी धुमाळ यांनी केली.

# मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

**समाचार/नगर-दि.२६**

मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, परस्पर संवाद वाढावा तसेच विवाह जुळवणीची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी या उद्देशाने स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था संचलित स्वराज्य मराठा वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने रविवार, दि. २८ जून रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, सावेडी येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा मेळावा होणार आहे. मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींनी आपल्या पालकांसह या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मेळाव्यात सहभागी होणाऱ्या युवक-युवतींनी बायोडाटा, दोन मोठ्या आकाराचे पूर्ण फोटो, पासपोर्ट साईज फोटो, आधारकार्ड तसेच पॅनकार्ड सोबत आणावेत. नोंदणी व परिचय प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. समाजातील युवक-युवतींना एकमेकांशी परिचय करून देण्यासाठी, संवादाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि विवाह जुळवणीसाठी विश्वासार्ह व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

# सनातन भास

**वैदिक हिंदू संस्कृतीबद्दल भासाला किती अभिमान होता हे आपण मागच्या लेखात पाहिलं, आता त्याच्या इतर नाटकात त्याची प्रचिती कशी येते ते पाहुयात.**

**'कर्णधार', नाटकात इंद्र ब्राह्मणाच्या वेषात कर्णाकडे येतो आणि त्याची कवचकुंडलं मागतो. कर्णाच्या लक्षात येतं तरीसुद्धा तो ताबडतोब ती काढून देतो. तो कोणाचही ऐकत नाही आणि वर म्हणतो, मी ब्राह्मणाला दिलेला शब्द कधीही परत घेत नसतो.**




**'मध्यमव्यायोग', नाटकात घटोत्कच राक्षसाची उपकथा आहे. आपल्या आईचा(हिडिंबेचा) उपास सोडण्यासाठी बळी म्हणून एका मध्यम ब्राह्मणाचा तो शोध घेत असतो. ' अरे मध्यमा, मध्यमा ' असे मोठ्याने ओरडत तो अरण्य दणाणून सोडत असता, भीम त्याच्यापुढे येऊन उभा राहतो. कारण कुंतीच्या तीन मुलात भीम मधला आहे. घटोत्कचाचं आणि भीमाचं युद्ध होतं आणि भीम त्याला जमिनीवर लोळवतो. इतक्यात हिडिंबा तिथे येते आणि भीमाला ओळखून त्यांचं भांडण मिटवते. कारण भीम तिचा पती असतो आणि त्याच्यापासून घटोत्कच झालेला असतो. हिडिंबा राक्षसी असल्याने नरमांसभक्षक होती. तिला उपास सोडण्यासाठी ब्राह्मण हवा होता आणि घटोत्कच मातृभक्त होता. पृथ्वीवर किंवा देवलोकांत माता श्रेष्ठ देवता आहे(श्लोक ३७) हे हिंदूधर्मातील नीतितत्व घटोत्कच पुनःपुनः म्हणतो.**

**'उरभंग' नाटकात भीमाने दुर्योधनाचा पराभव केला असून दुर्योधन रंगभूमीवर मृत्यू पावतो असं दाखवलं आहे. हे दृश्य नाट्यशास्त्राच्या नियमांविरुद्ध आहे.**

**रामायणातील उपाख्यानांवर आधारलेल्या दोन नाटकांपैकी, ' प्रतिमा' नाटकाच्या प्रारंभी भरताच्या राज्यारोहणाची तयारी दृष्टीस पडते. भरत आपल्या आजोळाहून अयोध्येला परत आलाय आणि नगरात प्रवेश केल्याकेल्या तो पूर्वजांच्या स्मृतिमंदिराला भेट देतो. त्या ठिकाणी मृत पूर्वजांच्या प्रतिमा ठेवलेल्या असतात. तिथे दशरथाची मूर्ती पाहून त्याला धक्का बसतो. चौकशी केल्यावर त्याला रामाचा वनवास आणि वडिलांचा मृत्यू या वार्ता त्याला समजतात. तू रामाला वनवासाला कां पाठवलं असं भरत कैकईला विचारतो तेंव्हा ती म्हणते, मला महर्षीच्या शापामुळे तसं करावं लागलं. ऋषींचा शाप अपरिवर्तनीय असल्यामुळे रामाला वनवासाला पाठवल्याशिवाय शापमुक्ती होणं शक्य नव्हतं. (अंक ६)**

**रावण ब्राह्मणाच्या वेषात सीतेचं हरण करायला जातो तेंव्हा असं सांगतो की, मी काश्यपगोत्री ब्राह्मण आहे. मी सांगोपांग वेदांचं अध्ययन केलं आहे; मनूचं धर्मशास्त्र, महेश्वराचं योगशास्त्र, बृहस्पतीचं अर्थशास्त्र, मेधातिथीचं न्यायशास्त्र आणि प्रचेतसाचं श्राद्धकल्प यांचं मी अध्ययन केलं आहे.**

**त्याचप्रमाणे सीता रामाबरोबर वनात जाण्याचा निश्चय करते तेंव्हा तिला कोणी परावृत्त करत नाही. कारण, प्रत्येकाला माहित आहे की, पत्नी पतीच्या मालकीची वस्तू आहे(१-२५)**

**'अभिषेक' नाटक वालीचा वध आणि सुग्रीवाची सिंहासनावर स्थापना प्रसंगावर आधारित आहे. वालीने सुग्रीवाची बायको पळवली होती आणि तिच्यासह तो राहात होता. ज्येष्ठ भ्रात्याने कनिष्ठ भ्रात्याच्या पत्नीबरोबर एकत्र राहू नये , अशी रामाने त्याची निर्भर्त्यसना करून त्याचा वध केला.**

**एक श्रेष्ठ नाटककार म्हणून भासाची योग्यता सर्वमान्य आहे आणि त्याचे ' स्वप्नवासवदत्ता' हे नाटक श्रेष्ठ दर्जाचे आहे, याबद्दलही कोणाचे दुमत नाही. त्याबद्दल पाहुच पुढील लेखात.**

**- देवाशिष शेडगे**

**मो.८८०६०४४४८६**




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. अचानक अधिक खर्च करावा लागेल. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **वृषभ** : व्यवसायवाढीचे प्रयत्न सफल होतील. थोरामोठ्यांच्या भेटी होतील. प्रवास शक्यतो टाळायला हवा.
- **मिथुन** : प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. आर्थिक स्थिती उत्तम राहील. कर्ज प्रकरणात दिलासा मिळेल.
- **कर्क** : महत्त्वाची कामं हातावेगळी होतील. समस्यांचं निराकरण वेळीच करावं. उष्णतेचे विकार संभवतात.
- **सिंह** : महत्त्वाच्या घडामोडी दिलासा देतील. भावंडांचं सौख्य लाभेल. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **कन्या** : व्यवसायात अडचणी येतील. कामासाठी प्रवास त्रायदायक ठरेल. प्रकृतीच्या तक्रारी संभवतात.
- **तूळ** : घरगुती व्यवसायात दिलासा मिळेल. नवी कामं मार्गी लागतील. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल.
- **वृश्चिक** : अनावश्यक खर्च कसोशीनं टाळावा. अनुभवींचा सल्ला कामी येईल. प्रवास लाभदायक ठरेल.
- **धनु** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. कामाचा उत्साह वाढता राहील. विद्यार्थ्यांना अडचणी संभवतात.
- **मकर** : ध्येयपूर्तीसाठी विशेष अनुकूलता राहील. धनलाभाचे योग आहेत. शिक्षण क्षेत्रात संधी लाभतील.
- **कुंभ** : ताण वाढवणाऱ्या घटना संभवतात. खऱ्या हितचिंतकांची पारख करा. व्यवसायात दिलासा मिळेल.
- **मीन** : उधार-उसनवार व्यवहार टाळावे. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी. कौटुंबिक समाधान लाभेल

## २७ जून — दिन विशेष

**२०१३** : अबू सालेमवर तळोजा कारागृहात कैद्याकडून गोळीबार.

**२०१५** : व्हॅटिकन चर्चने पॅलेस्टाईनला देश म्हणून मान्यता देत त्यांच्याबरोबर करार केला.

**२०१७** : विश्वासभंग केल्याने युरोपियन समितीने गुगलला २.४ अब्ज युरोचा दंड ठोठावला.

**२०१८** : राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि त्यांच्या पत्नी सविता यांना जगन्नाथ मंदिरामध्ये सेवकऱ्यांच्या गैरवर्तणुकीस सामोरं जावं लागल्याची घटना.

## आरोग्यमंत्र — कर्करोगाच्या निदानासाठी...

दिवसेंदिवस कर्करोगाने ग्रस्त असणाऱ्यांचं प्रमाण वाढत आहे. कर्करोगाने रुग्णाचे पूर्ण आयुष्य विस्कळित होते. ते आटोक्यात आणण्यासाठी या रोगावरील उपचारांच्या दृष्टीने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यावर वैद्यकशास्त्राला भर द्यावा लागतो. अशा प्रयत्नांद्वारे नवीन शोध लागतात आणि कॅन्सरचं निदान वेळेत होणं शक्य होतं. त्यातही कॅन्सरची गाठ शरीराच्या कोणत्या भागात आहे, हे कळल्यास अचूक उपचार करता येतात. यासाठी सध्या बायोप्सीचा पर्याय अनुसरला जातो. मात्र हीदेखील काहिशी गुंतागुंतीची प्रक्रिया असते. अलिकडेच याबाबतचा एक शोध लागला आहे. त्यामुळे कॅन्सर शरीराच्या कोणत्या भागात पसरलाय हे एका साध्याशा रक्ततपासणीद्वारे कळणं शक्य होणार आहे.



रक्तातल्या कॅन्सर पेशींच्या डीएनएद्वारे कॅन्सरचं निदान होत असलं तरी हा विकार शरीराच्या कोणत्या भागात पसरलाय याबाबत काहीही कळत नाही. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांना यश आलं असून हे कळणं आता शक्य होणार आहे. अमेरिकेतल्या 'युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया'चे प्राध्यापक कुन झांग या शोधाबाबत माहिती देतात. ते सांगतात, कॅन्सर पेशींच्या कचाट्यात सापडून निरोगी पेशी मरून जातात. या पेशींचे डीएनए रक्तात सापडतात. याच्या मदतीने कॅन्सरग्रस्त टिश्यूंचा शोध घेणं सोपं जातं. तसंच कॅन्सर शरीराच्या कोणत्या भागात पसरलाय हे जाणून घेणंही शक्य होतं.

## टेक फन — शेतात राबणारा रोबो

छोट्यांनो, रोबो आता शेतात राबणार आहे. एका कंपनीने बदकाच्या आकारचा रोबो तयार केला आहे. हा रोबो तांदळाच्या पिकाला लागलेली कीड आणि इतर किडे खाईल. त्याला 'डक रोबो' असं म्हटलं जातं. सध्या त्याच्या प्रतिकृतीची चाचणी सुरू आहे. पिकांवरची कीड खाण्यासाठी बदकांचा वापर होतो. आता त्यांची जागा हा रोबो घेऊ शकेल. जपानमधल्या निस्सान या कंपनीने ही शक्कल लढवली आहे. आयगामो असं त्याचं नाव आहे. आयगामो ही बदकांचीच एक प्रजाती आहे. दीड किलो वजनाचा हा रोबो मोठ्या व्हॅक्युम क्लीनरसारखा दिसतो. यावर बसवण्यात आलेले रबराचे दोन रोटेटिंग ब्रश बदकाच्या फताड्या पायांप्रमाणे काम करतात. यामुळे हा रोबो पाण्यात आरामात पोहू शकतो. यामुळे पाण्यातल्या ऑक्सिजनची पातळी वाढते. या रोबोमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. जपानमध्ये रोबोंचा खूप उपयोग होतो. इथली लोकसंख्या कमी असल्यामुळे मजूर मिळत नाहीत. तसंच त्यांची मजुरीही खूप जास्त असते. त्यामुळे इथे रोबोंचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. डक रोबो शेताची जबाबदारी सांभाळू शकतो.

## स्टाईल स्टेटमेंट — बेल्टने द्या ट्विस्ट

✻ सोनाक्षी सिन्हानेही ब्लॅक धोती पँटसोबत प्रिंटेड किमोनो कॅरी केला होता. यावर तिने ब्लॅक अँड व्हाईट बेल्ट घातला होता.

✻ ट्रेंडी सलवार कमीजवरही बेल्ट लावता येईल. शिल्पा शेट्टीने रफल सलवार सूटवर गोल्डन लेसवाला बेल्ट लावला होता. कोणत्याही ऑकेजनसाठी हा लूक बेस्ट आहे.

✻ वेस्टर्न कपड्यांवरही तुम्ही बेल्ट कॅरी करू शकता. आलिया भट्टने मध्यंतरी स्ट्राईपवाला शर्ट ड्रेस घातला होता. तिने त्यावर मोठ्या आकाराचा बक्कल बेल्ट लावला होता.

✻ फॉर्मल वेअर म्हणून सध्या कोट पँटची चलती आहे. हा लूकही बेल्टने खुलवता येईल. तमन्ना भाटियाने गडद हिरव्या रंगाचा कोट स्टाईल पेहराव केला होता. त्यावर तिने त्याच रंगाचा मोठा बेल्ट लावला होता. ऑफिसमध्ये ही स्टाईल कॅरी करायला हरकत नाही.

## पंचांग

**शनिवार, २७ जून २०२६**

पराभवनाम संवत्सर शके १९४८, निज ज्येष्ठ शु. १३, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : साध्य, सूर्योदय ६.०६ सूर्यास्त ७.१८

## फॉरवर्डस

**बाज़ीगरी भीं अज़ीब हैं इन्सानी रिश्तों क़ी ज़नाब...**

**एक़ हीं शख़्स क़ई रंगों में नज़र आता हैं...!**

## वेगळ्या वाटा

✻ यादी केल्यानंतर बाजारपेठेबाबत थोडं संशोधन करा. यामुळे तुम्हाला भावी ग्राहक, त्यांच्या आवडीनिवडी याबद्दल कळू शकेल. त्यांच्यापर्यंत कसं पोहोचायचं हे तुम्ही ठरवू शकाल. ✻ उत्पादन किंवा सेवा बाजारात उतरवण्याआधी आपली कल्पना तपासून घ्या. काही ग्राहकांना उत्पादनाची माहिती द्या. तुमची उत्पादनं किंवा सेवा त्यांना वापरायला द्या. त्यांच्याकडून सूचना मागवा. उत्पादनांमध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर तसा विचार करा. ✻ यानंतर तुमच्या उत्पादनाला किंवा सेवेला नाव द्या. मार्केटिंगचं तंत्र जुळवा. लवकरात लवकर उत्पादन बाजारात आणा.

## करिअरवाटा — निवडा 'युनिक' क्षेत्र...

पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा काहीतरी वेगळं करण्याची इच्छा असणाऱ्या युवक-युवतींसाठी अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. बदलत्या जमान्यातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन कुशल कर्मचारी निर्माण करण्याची क्षमता त्यांमध्ये आहे. त्यामुळेच या पर्यायांद्वारेही करीअरच्या चांगल्या संधी मिळू शकतात. ✻ आपल्या क्लाएंटची प्रतिमा उत्तम राखण्याची जबाबदारी इमेज कन्सल्टंटवर असते. वॉर्डरोब, फॅशन, मेकओव्हर कन्सल्टंट म्हणूनही ते ओळखले जातात. क्लाएंट्सच्या इच्छेनुसार त्यांचा लूक किंवा प्रोफाईल घडवण्याच्या कामात इमेज कन्सल्टंट मदत करतात. अंगभूत कौशल्याच्या बळावर या क्षेत्रात पुढे जाता येतं. कोणत्याही शाखेतले युवा करीअर म्हणून याचा विचार करू शकतात. सेलेब्रिटींचे इमेज कन्सल्टंट म्हणूनही काम करण्याची संधी मिळते. ✻ स्मार्टफोनमुळे मोबाईल गेम्सचं प्रस्थ वाढलं आहे. या गेम्सनी तरूणांना वेड लावलं आहे. अशा परिस्थितीत तंत्रज्ञान, ग्राफिक्सची आवड असणारे तरुण गेम डेव्हलपर म्हणून करीअर करू शकतात. बारावीनंतर डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करून या क्षेत्रात पुढे जाता येईल.



## खेचाखेची — आणखी एक पाठव

वडिलांनी व्हॉट्सअॅप इन्स्टॉल केलं आणि मुलाला मेसेज पाठवला...

'मला एक विनोद पाठव.'

**मुलगा** : मी आत्ता अभ्यास करतोय.

**वडील** : मस्त!

आणखी एक पाठव.

## वेगळं काही

इंदूरमधल्या गजेंद्र शर्मा या तरुणाने शहाळ्यावर अनोख्या कलाकृती साकारल्या आहेत. फक्त दोन दिवसात त्याने शहाळ्याच्या कवचावर ५१ कलाकृती साकारल्या. यासाठी त्याला फक्त ७२ रुपये खर्च आला. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस' आणि 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'मध्ये त्याच्या या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे. गजेंद्रने सर्वप्रथम शहाळ्याच्या कवचावर लाल किल्ल्याचं चित्र काढलं. त्यानंतर कुतुबमिनार, हवा महल, चीनची भिंत, ताज महालासह युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीतल्या ५१ वास्तू त्याने रेखाटल्या. 'इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्डस'मध्ये 'मॅक्झिमम वर्ल्ड हेरिटेज स्केच्ड ऑन वेस्ट कोकोनट शेल' या शीर्षकाअंतर्गत त्याची ही कामगिरी नोंदवण्यात आली आहे.

## सौंदर्यसाधना — लिप कलर निवडताना...

लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. मात्र ती चेहऱ्याला, स्कीन टोनला शोभणारी हवी. अशी लिपस्टिक निवडण्यासाठी काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.

✻ बाजारात शायनी लिपस्टिक्सची चलती आहे. अशा लिपस्टिक फारशा चिकट नसतात. पण ओठ चमकदार दिसावेत यासाठी त्यात पुरेसा ग्लॉस असतो. ✻ लिक्विड लिपस्टिक्स हा प्रकारही इन आहे. त्यांचे एचडी रंग आणि बराच काळ टिकून राहण्याच्या गुणधर्मामुळे हा प्रकार महिलांच्या पसंतीला उतरत आहे. त्यामुळे तुमच्या मेक अप किटमध्ये लिक्विड लिपस्टिक असायला हवी. ✻ सॉफ्ट मॅटे लिपस्टिक हा प्रकार प्रचंड लोकप्रिय आहे. या लिपस्टिक्स सॅटिन, क्रीमी तसंच सॉफ्ट मॅटे टेक्स्चरमध्ये येतात. नेहमीच्या मॅटे लिपस्टिकमुळे ओठ कोरडे पडतात. पण सॉफ्ट मॅटे लिपस्टिकमुळे ओठांचा ओलावा टिकून राहतो. ✻ लिप टिंट हा प्रकारही तुम्ही ट्राय करू शकता. हा प्रकार ओठांसाठी अत्यंत योग्य आहे. ओठांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवणारी तसंच लिप बामची अनुभूती देणारी ही लिपस्टिक आहे. अशा लिपस्टिकची आवड असेल तर तुम्ही लिप टिंटची निवड करायला हवी.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

शुक्रवार दि. २६ जून २०२६ पान ३




## अर्ज़ किया है...

**जब यार ने उठा कर ज़ुल्फ़ों के बाल बाँधे**
**तब मैं ने अपने दिल में लाखों ख़याल बाँधे**

**- मोहंमद रफी सौदा**

हा खूप सुंदर आणि रोमँटिक शेर आहे.या शेरामध्ये प्रियसीच्या सौंदर्याचे आणि तिच्या एका छोट्याशा कृतीमुळे प्रेमिकाच्या मनात निर्माण होणाऱ्या भावनांचे अतिशय बहारदार वर्णन केले आहे. जेव्हा माझ्या प्रियसीने आपले विखुरलेले केस वर उचलून एकत्र बांधले, तेव्हा तिच्या त्या एकाच अदामुळे माझ्या मनात लाखो विचार आणि कल्पनांची गर्दी झाली.

### पान १ वरुन

## आंदोलन करणे दुटप्पीपणा-दीप चव्हाण

पक्षाचे निष्ठावंत आणि आता भाजपात असलेल्या नगरसेवकाच्या वॉर्डात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलाने नशेच्या अंमलात आपले आई वडील बहिणीवर प्राणघातक हल्ला केला आणि नंतर आत्महत्या केली. या अगोदर असेच एका युवकाने आईवर हल्ला करून तिचा जीव घेतला. अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत असलेल्या एकाने फक्त वडिलांनी चापट मारली म्हणून त्यांच्यावर झोपेत असताना कुऱ्हाड त्यांच्या डोक्यात घातली. आणि त्यांचा जीव घेतला. वृत्तवाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत तर त्यांनी शहरात गेल्या ६ महिन्यापासून तरुण अल्पान्वयीन मुले नशेच्या आहारी जात असल्याचे कबूल केले. त्यावेळी त्यांनी पोलिसांना याबाबत निवेदन देखील दिले होते. मग त्यावेळीच त्याचा पाठपुरावा का केला नाही, असा सवाल त्यांनी केला.

### पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा

# चास, निमगाव वाघा, निंबळक, नेप्ती मार्केट रस्त्याची दुरुस्ती करा- डॉ. पवार

**समाचार/नगर-दि.२६**

चास, निमगाव वाघा ते निंबळक तसेच नेप्ती मार्केट, निमगाव वाघा ते पिंपळगाव कौडा, भोर वस्ती या दोन्ही महत्त्वाच्या रस्त्यांची अक्षरक्ष: दुरवस्था झाली असून तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी नगर तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चास, निमगाव वाघा आणि निंबळक या गावांना जोडणारा हा मार्ग शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गावर अवजड वाहनांचीही मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर खड्ड्यांमध्ये पाणी साचून परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यापूर्वीही याबाबत निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले होते, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. येत्या आठ दिवसांत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु न झाल्यास कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगर तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार, माजी पंचायत समिती सभापती रामदास भोर, अंकुश आतकर यांनी दिला आहे.

## सर्जेपुरा येथील पोस्ट ऑफिस बंद करु नये - गंधे

**समाचार/नगर-दि.२६**

शहरातील सर्जेपुरा येथील पोस्ट ऑफिस बंद करण्याच्या ग्राहकांना कुठली पूर्व सूचना न देता पोस्ट ऑफिस बंद करणे अथवा मुख्य पोस्ट ऑफिस कार्यालयात विलीन करण्याची प्रक्रिया आपण केलेली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

या निर्णयामुळे परिसरातील जनजीवनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे, सदरचे पोस्ट ऑफिस बंद करु नये, अशी मागणी भाजपाचे जिल्हा कार्यालयात मंत्री कुकुल गंधे यांनी वरीष्ठ डाक अधिक्षकांकडे केली. सर्जेपुरासह तेली खुंट, रामवाडी, बागडपट्टी, डाळमंडई आडते बाजार, दादा गॅरेज, कोठला बस स्थानक, तोफखाना, दिल्लीगेट आणि बालिकाश्रम रोड यासारखा मोठा परिसर या पोस्ट ऑफिसशी जोडलेला होता या भागात खातेदारांची संख्या मोठी असून प्रामुख्याने शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना आर्थिक व्यवहारासाठी हे केंद्र अत्यंत सोयीचे होते तसेच सदर परिसरातील बँका विविध आर्थिक संस्था व आफिस यांना हे पोस्ट ऑफिस जवळ पडत होते. पोस्ट ऑफिस प्रशासनाने सदरचे ऑफिस बंद करण्याचा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणी करीत आहे, असे मुकुल गंधे यांनी म्हटले आहे.


## रेणुका देवी विद्यालयात शालेय साहित्य वाटप

**समाचार/नगर-दि.२६**

रेणुका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव पिसा येथे उद्योजक गोरख भालके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. प्रणोती जगताप उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब पांडुरंग मुठे होते. विद्यार्थ्यांना शालेय बॅग,स्टेशनरी साहित्याचे वितरण करण्यात आले. भालके यांनी सांगितले की, शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. प्राचार्य मुठे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणात सातत्य ठेवून आपले ध्येय निश्चित करावे. समाजातील दानशूर व्यक्ती आणि उद्योजकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते. गोरख भालके यांनी केलेली मदत विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणारी असून अशा उपक्रमांमुळे शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम बनते. त्यांनी या उपक्रमाबद्दल गोरख भालके यांचे विशेष आभार मानले. कार्यक्रमास अशोक गायकवाड, प्रसाद शिंदे, दिलीप ननवरे, बाळासाहेब मांडगे, शशिकांत उबाळे, शहाजी भापकर, शाम घेगडे, संदीप बोबडे, महेश पाडळे, अविनाश मांडगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित होते.

## निधन वार्ता

### कुंतीलाल भंडारी



**समाचार/नगर-दि.२६**

गणेशवाडी परिसरातील ज्येष्ठ नागरिक तथा सामाजिक क्षेत्रात परिचित असलेले कै. श्री कुंतीलालजी भगवानदासजी भंडारी यांचे दुःखद निधन झाले आहे. मेहुल (टिनूभाऊ) भंडारी यांचे वडील तसेच वृषभ भंडारी यांचे आजोबा होते. त्यांच्या निधनामुळे भंडारी परिवारासह मित्रपरिवार आणि परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे. कै. कुंतीलालजी भंडारी यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळाच्या वतीने कै. भंडारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### केशव भारताल



**समाचार/नगर-दि.२६**

लष्कराच्या एसी सेंटरचे निवृत्त कर्मचारी व सिव्हिल हडको येथील रहिवासी केशव नारायण भारताल यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते मनमिळावू आणि धार्मिक वृत्तीचे होते. सीक्यूएव्ही आस्थापनेतील कर्मचारी नितीन भारताल यांचे ते वडील होत. चित्रकलेतही त्यांचा हातखंडा होता. त्यांनी रेखाटलेली विविध शैलीतील चित्रे चांगलीच गाजली होती. नालेगाव अमरधाममध्ये भारताल यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## कृष्णराज महाडिकांचे स्व. अरुणकाका जगताप यांना अभिवादन

**समाचार/नगर-दि.२६**



भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते कृष्णराज महाडिक यांचा सत्कार करण्यात आला. भेटीदरम्यान त्यांनी स्वर्गीय माजी आमदार अरुण काका जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले.

या प्रसंगी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक महेश तवले, भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे, माजी नगरसेवक संभाजी पवार, विशाल पवार, अतुल कावळे, सचिन पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी युवकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात आमदार संग्राम जगताप यांच्याशी सविस्तर चर्चा केली. युवकांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम राबविणे तसेच विकासकामांना गती देण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय झाला.

चर्चेदरम्यान कृष्णराज महाडिक यांनी अहिल्यानगर शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत सुरु असलेल्या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेले उपक्रम आणि नागरिकाभिमुख कामांमुळे शहराच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

## 'सुरेख संगम' चे संस्थापक वसंत सोमणी यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२६**

शहरातील जुने आणि प्रसिध्द 'सुरेख संगम' या भांड्यांच्या दालनाचे संस्थापक वसंतराव उर्फ बापू सोमणी यांचे आज दि. २६ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. ते ९४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. व्यावसायिक अतुल सोमणी यांचे ते वडील होत.

बहुआयामी व्यक्तिमत्व असणारे वसंतराव सोमणी यांनी काही काळ पोलिस खात्यात नोकरी केली, त्याचबरोबर पत्रकार म्हणून देखील काम केले. हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचे ते अधिकृत केरोसीन विक्रेते देखील होते. 'सुरेख संगम'या त्यांच्या दालनाची नगर जिल्ह्यातील भांडी व्यवसायात विशेष ओळख आहे.

सोमणी यांना व्यायामाची, वाचनाची व संस्कृत श्लोकांच्या अभ्यासाची विशेष आवड होती. सर्वांना आपलेसे करणारा स्वभाव व प्रभावी वक्तृत्व शैली यामुळे ते समाजातील अनेक स्तरांमध्ये लोकप्रिय होते. त्यांच्या निधनाने अनेक क्षेत्रातून दुःख व्यक्त होत आहे.



सोमणी यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी ५ वाजता अमरधाम नालेगाव येथे अंत्यसंस्कार होणार आहे.

## दोन अज्ञातांचा चालकावर जीवघेणा हल्ला

**समाचार/नगर-दि.२६**

स्टेट बँक चौक परिसरात एका चालकावर दोन अज्ञात व्यक्तींनी लाकडी काठी व लोखंडी गजाने हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नामदेव अंबादास बडे (वय ४०, सध्या रा. सारसनगर, अहिल्यानगर) हे २४ जून रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास स्टेट बँक चौक येथून घरी जात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांना थांब, थांब असे म्हणत शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या दुचाकीसमोर स्वत:ची गाडी आडवी लावून लाकडी काठीने त्यांच्या पाठीवर व डाव्या हातावर मारहाण केली. मारहाणीमुळे नामदेव बडे हे खाली पडल्याने आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच एका आरोपीने लोखंडी गजाने डोक्यावर वार करून त्यांना जखमी केले. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ पी. ए. बारगजे करीत आहेत.

## राम जन्मभूमी ट्रस्टचे चंपत राय यांचा राजीनामा

**समाचार/नवी दिल्ली-दि.२६**

राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी राजीनामा दिला आहे. दान चोरी प्रकरण समोर आल्यानंतर त्यांच्यावर राजीनाम्याचा दबाव होता. विश्व हिंदू परिषदेच्या निर्दे शावरुन त्यांनी राजीनामा दिला आहे.

.चंपत राय यांच्याशिवाय ट्रस्टचे दुसरे सदस्य अनिल मिश्रा यांनी सुद्धा राजीनामा दिला आहे. उत्तर प्रदेश सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. त्यांचा प्राथमिक रिपोर्ट आल्यानंतर एफआयआर नोंदवण्यात आला आहे. अयोध्या राम मंदिरात मोठ्या संख्येने भक्त दर्शनासाठी येत असतात.

### स्व.प्रा.शिरीष मोडक यांना शोकसभेत साश्रूनयनांनी श्रद्धांजली

# शिक्षण व साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त




**समाचार/नगर-दि.२६**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन येथील सारडा महाविद्यालयात करण्यात आले होते. नगर शहरासह जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील व्यक्तींनी शोकसभेस उपस्थिती लावून मोडक यांच्या स्मृतींना उजाळा दिला. भावना व्यक्त करताना अनेकांना गहिवरून आले. प्रा.मोडक यांच्या निधनाने शिक्षण व साहित्य क्षेत्रात निर्माण झालेल्या पोकळीमुळे मोठी हानी झाल्याच्या भावना यावेळी उपस्थितांनी साश्रूनयनांनी व्यक्त केल्या.

कै.प्रा.शिरीष मोडक यांच्या प्रतिमेस हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, माजी कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, स्व.मोडक यांचे चिरंजीव सुश्रुत व कन्या श्रुती यांनी पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून तसेच सामुहिक श्रद्धांजली वाहून शोकसभेस सुरवात झाली.

ब्रिजलाल सारडा म्हणाले, थोर व्यक्तींनी हिंद सेवा मंडळाची स्थापना ज्या उद्देशाने केली त्याच उद्देशाने व विचाराने कै.मोडक यांनी संस्थेचे अध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कारभार पाहिला. त्यांच्या काळात संस्थेची मोठी प्रगती झाली. त्यांच्या सारखे व्यक्तिगत परत संस्थेला मिळणार नाही.

ॲड.अनंत फडणीस म्हणाले, कै.मोडक सर हे सर्वांचे मार्गदर्शक व घनिष्ठ मित्र असलेले बहुश्रुत व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाने सर्वांच्या मनाला चटका लागला आहे. त्यांचे कार्य व विचाराने काम करून हिंद सेवा मंडळाला पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. शोकसभेसाठी पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक व सेनापती दादा चौधरी यांचे नातू प्रमोद चौधरी, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. जयंत कुलकर्णी व ज्येष्ठ मार्गदर्शक शामसुंदर सारडा यांनी शोकसंदेश पाठवला होता. यावेळी प्रा. मधुसूदन मुळे, सीए अशोक गुर्जर, फिरोज तांबटकर, मर्चंट बँकेचे संचालक किशोर मुनोत, सीए राजेंद्र काळे, दीनदयाळ पतसंस्थेचे उपाध्यक्ष विकास पाथरकर, सतीश लोटके, जिल्हा वाचनालयाच्या उपाध्यक्षा प्रा.ज्योती कुलकर्णी, सुरेश चव्हाण, डॉ. विजय भंडारी, सचिन पारखी, डॉ. रमेश झरकर, अनंत देसाई, मधुसूदन सारडा, डॉ.पारस कोठारी, जगदीश झालानी, रणजीत श्रीगोड, विलास बडवे, वैशाली जोशी, ईश्वर बोरा, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, अमृत मुथा यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यक्तींनी तसेच हिंद सेवा मंडळाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी मनोगतातून शिरीष मोडक यांना श्रद्धांजली अर्पण केली. सूत्रसंचालन प्रा.प्रसाद बेडेकर यांनी केले.



## दिव्यांगांना सहाय्यक साधन मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील-खा. लंके

**समाचार/नगर-दि.२६**

अहिल्यानगर लोकसभा मतदार संघात दिव्यांग जन व जेष्ठ नागरिक यांचेसाठी मोफत सहाय्यक साधन व उपकरण वितरणाकरिता मुल्यमापन शिबीराचे आयोजन करणे करिता जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर येथे खा. निलेश लंके यांचे अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. जास्तीत जास्त दिव्यांगांना सहाय्यक साधने मिळवुन देण्यासाठी कायम प्रयत्नशील आहोत असे खासदार लंके यांनी सांगितले.त्याचबरोबर जिल्हा रूग्णालयात दिव्यांगांना येणा-या अडचणी, दिव्यांग प्रमाणपत्र वाटप याबाबत पुढील आठवड्यात जिल्हयातील सर्व दिव्यांग संघटना यांना सोबत घेवुन जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर यांचे सोबत बैठक आयोजन करणेबाबत खा निलेश लंके यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष रत्नाकर ठाणगे, खासदार निलेश लंके प्रतिष्ठान दिव्यांग संघटनेचे सुनील करंजुले, सावली दिव्यांग संघटनेचे बाबासाहेब महापुरे, बाहुबली वायकर, प्रहार दिव्यांग संघटनेचे मधुकर धाडगे, पोपट शेळके, आसान दिव्यांग संघटनेचे संजय साळवे, प्रहार संघटनेचे लक्ष्मण पोकळे, महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संतोष सरवदे, बाळासाहेब चव्हाण , जिल्हा सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे तसेच अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित होते .

## अ.भा.गांधर्व महाविद्यालय कथक परीक्षा

# नृत्यझंकारचे नेत्रदीपक यश; ३८ विद्यार्थिनींना विशेष योग्यता

समाचार/नगर-दि.२६

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या कथक नृत्याच्या विविध स्तरावरील परीक्षांमध्ये नृत्यझंकार डान्स स्कूलच्या विद्यार्थिनींनी नेत्रदीपक यश संपादन करत अहिल्यानगर केंद्रात मानाचे स्थान पटकावले आहे. पहिली ते पाचवी या विविध स्तरांच्या परीक्षांमध्ये तब्बल ३८ विद्यार्थिनींनी विशेष योग्यता प्राप्त केली असून सर्वच स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे नऊ विद्यार्थिनींनी पैकीच्या पैकी गुण मिळवत उत्कृष्टतेचा नवा मानदंड निर्माण केला आहे.



प्रारंभिक (प्रथम वर्ष) परीक्षेत रेणुका दहातोंडे, वर्षा चांडाळे, शीतल शेळके, सृष्टी धामणे, स्माईली परदेशी, सिद्धी घोडेस्वार, गायत्री बेल्हेकर आणि अन्विता कुलकर्णी यांनी विशेष योग्यता मिळवली, तर दिविजा कापसे हिने प्रथम क्रमांक पटकावत केंद्रात मानाचे स्थान मिळवले. प्रवेशिका पूर्ण (द्वितीय वर्ष) परीक्षेत धनश्री गाडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. जान्हवी अकुबतीन हिने तृतीय क्रमांक पटकावला. प्रवेशिका प्रथम परीक्षेत डॉ. भक्ती क्षीरसागर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच सानवी दुगम, रिया गवळी, सानवी भोर आणि सार्थिका पानसरे यांनी तृतीय क्रमांक मिळवत संस्थेच्या यशात भर घातली. मध्यमा पूर्ण (पाचवे वर्ष) परीक्षेत सई गर्जे हिने प्रथम क्रमांक, समृद्धी खिस्ती हिने द्वितीय क्रमांक तर मनस्वी गंधे हिने तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थिनींना नृत्यझंकार डान्स स्कूलच्या संचालिका तथा कथक नृत्यगुरू प्रिया ओगले-जोशी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रिया ओगले-जोशी म्हणाल्या, कथक ही केवळ नृत्यकला नसून ती भारतीय संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे जतन करणारी साधना आहे. कथकच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच संस्कारांचे संवर्धन होते. भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांना शास्त्रीय नृत्याकडे आकर्षित करून त्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

# केंद्रप्रमुखपदी निवडीबद्दल वाकचौरे यांचा सत्कार



समाचार/नगर-दि.२६

प्राचार्य बाळासाहेब वाकचौरे यांचे चिरंजीव ललित वाकचौरे यांनी अत्यंत तरुण वयात केंद्रप्रमुख पदासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धात्मक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून केंद्रप्रमुख पद प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल गुलकंद मॉर्निंग ग्रुपच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. सुनील पंडित यांच्या हस्ते वाकचौरे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी प्राचार्य बाळासाहेब वाकचौरे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, गुलकंद मॉर्निंग ग्रुपचे सुधाकर देवतसे, गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते कैलास दळवी, माजी पीएसआय आरोडे, तावरे, संजय कुलकर्णी, मनपाचे माजी अभियंता डवरे, उद्योजक प्रदीप जावळे, नालेगाव विभागांचे प्रमुख नानासाहेब देवतरसे, माजी नगराध्यक्ष अंबादास पंधाडे, पीआरओ संघटनेचे जिल्हाध्यक्ष संपत पंडित, दशरथ कराळे तसेच माजी पोलीस कॉन्स्टेबल भापकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत पूर्वप्राथमिक (बालवाडी) विभागातील मुलांचे स्वागतानिमित्त मुलांच्या हस्ते हवेत फुगे सोडून स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांकरीता रंगीबेरंगी फुग्याचे तोरण, रांगोळया काढण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमास संस्थेच्या खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, शाळा समिती सदस्या कल्पना वायकर, माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी, मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे, बालवाडी विभागप्रमुख लता मोढवे आदी उपस्थित होते. एक अनोख्या संकल्पनेतून मुलांकरीता काही तरी नवीन देण्याच्या उद्देशाने जोकर आणि डोनाल्ट डक यांना शाळेत आणले होते. त्यामुळे छोटे मुले रडण्याचे जणू काही विसरले होते. शिक्षकांनी मुलांच्या अंगावर फुलांचा वर्षाव करत त्यांचे स्वागत केले.

## सुरज कोतकर यांची मागणी

# केडगाव मधील भाग्योदय मंगल कार्यालय नागरिकांसाठी खुले करावे

समाचार/नगर-दि.२६



केडगाव येथील प्रभाग क्रमांक १६ मधील महानगरपालिका मालकीचे भाग्योदय मंगल कार्यालय सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर यांनी आ. संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रभागातील भाग्योदय मंगल कार्यालय हे मागील काही वर्षांपासून अत्यंत जीर्ण अवस्थेत व बंद स्थितीत होते. मात्र, या मंगल कार्यालयाचे नूतनीकरण व सुशोभीकरण अत्यंत दर्जेदार पद्धतीने करण्यात आले आहे. भाग्योदय मंगल कार्यालय सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू झाल्यास प्रभागातील गरीब, सर्वसामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबांना अत्यल्प दरात विवाह सोहळे, सामाजिक कार्यक्रम, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध कौटुंबिक समारंभ आयोजित करण्यासाठी मोठा आधार मिळणार आहे. खासगी मंगल कार्यालयांचे वाढते भाडे लक्षात घेता महानगरपालिकेचे हे मंगल कार्यालय नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की लवकरात लवकर मंगल कार्यालय सुरू करण्याबाबत महापालिका प्रशासनाला सूचना दिल्या जातील असे ते म्हणाले

# २९ जून रोजी निधी आपके निकट कार्यक्रमाचे आयोजन

समाचार/नगर-दि.२६

निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी निधी आपके निकट' हा विशेष कार्यक्रम सोमवार, दि. २९ जून रोजी सकाळी ९.३० वाजता कल्पतरु एंटरप्राइजेस इंडिया, कल्पतरू एनक्लेव दुसरा मजला, टायटन आय प्लस वर, गोल्ड जिम, प्रोफेसर चौक, सावेडी येथे आयोजित करण्यात आला आहे. भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक किंवा प्रशासनिक अडचणी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेचे सहायक भविष्य निधी आयुक्त यांनी केले आहे.

# राजेंद्र खुंटाळे यांचा ५ जुलैला सेवापूर्ती गौरव समारंभ

समाचार/नगर-दि.२६

अहिल्यानगर जिल्हा देखरेख संघाचे सचिव तसेच तालुका सुपरवायझर या पदांवर कार्यरत राहून प्रदीर्घ सेवा बजावणारे राजेंद्र खुंटाळे दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. खुंटाळे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ रविवार दि.५ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता निंबळक येथील सार्थक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास आ.अक्षय कर्डिले, आ.काशिनाथ दाते, पद्मश्री पोपटराव पवार आदींसह राजकीय, सहकार, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन मिनाक्षी खुंटाळे यांनी केले आहे.

# भ्रष्ट क्रीडा धोरणामुळे गुणवंत खेळाडूंवर अन्याय

## साप्ताहिक संवाद

नुकताच जागतिक ऑलिम्पिक दिवस साजरा करण्यात आला. याच आंतराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये आजवर भारतातील आणि आपल्या महाराष्ट्रातील देखील अनेक गुणवंत खेळाडूंनी अगदी हाताच्या बोटावर मोजता येण्याजोग्या पदकांवर आपले नाव कोरलेले आहे. कारण अर्थातच,आपल्या राज्यात गुणवंत खेळाडूंना पोषक,प्रोत्साहनपर असं क्रीडा धोरण राज्य राबविण्याचा प्रयत्न जरूर करतेय,परंतु क्रीडा धोरणातील त्रुटी आणि अधिकारी वर्गाची भ्रष्ट नीती यामुळे खेळाडूंवर अन्याय होतोय. राज्यातील याच असंख्य गुणवंत खेळाडूंना न्याय मिळवून देण्यासाठी संभाजीनगरचे राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक महेश इंदापूरे यांनी आंदोलन सुरू केले आहे.त्याच अनुषन्गाने महेश यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.



**राज्याच्या क्रीडा धोरणांत नेमक्या काय त्रुटी आहेत?**

आपल्या महाराष्ट्रातील शिवछत्रपती पुरस्कार,अर्जुन पुरस्कार प्राप्त अनेक गुणवंत खेळाडू आहेत. अर्थात राज्यातील तमाम खेळाडूंसाठी राज्य सरकार चांगले क्रीडा धोरण राबविते,चांगल्या योजना राबविण्याचा प्रयत्न करते. परंतु या धोरणाची अंमलबजावणी करताना मात्र त्यात मोठा भ्रष्टाचार होताना दिसतो. म्हणूनच अनेक खेळाडू चांगल्या योजनांपासून वंचित राहतात. आपल्या राज्यात राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या खेळाडूला अवघ्या ११ हजारांचा लाभ मात्र हरियाणामध्ये अशा खेळाडूला ३ लाख आणि सरकारी नोकरी दिली जाते इतका ... फरक आहे. खेळाडूंसाठी ... अपघाती विम्याची ... तरतूद देखील ... नाही. प्रशिक्षक ... आणि पंचांना ... कमी मानधन,क्रीडा उपसंचालक सुहास पाटील यांचा कोट्यवधींचा घोटाळा अशा परिस्थितीत खेळाडूंवर प्रचंड अन्याय होतोय.

**याच पार्श्वभूमीवर आपल्या सरकारकडे काय मागण्या आहेत?**

खेळाच्या आणि खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सरकारकडे काही मागण्या केलेल्या आहेत. सीबीएससी बोर्डाच्या धर्तीवर एस एस सी च्या विद्यार्थ्यांना देखील ग्रेस देण्यात यावी. क्रीडा आरक्षण हे ५ टक्क्यांवरून दहा टक्के करण्यात यावे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या खेळाडूंना सरकारने नोकरी द्यावी. तसेच महिला खेळाडूंसाठी लाडकी खेळाडू योजना सरकारने राबवावी, खेळाडूंसाठी अपघाती विमा,क्रीडा धोरणातील भ्रष्टाचार मुक्ती,प्रशिक्षक आणि पंचांच्या मानधनात वाढ अशा आमच्या मागण्या आहेत.

**आपल्या अनेक देशी खेळांचा ऑलिम्पिक मध्ये समावेश करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत का?**

नक्कीच, कबड्डी असेल खोखो,आट्यापात्या, लगोरी, मल्लखांब असे अनेक देशी खेळ हे आता क्रिकेटच्या बरोबरीनेच अगदी राष्ट्रीय स्तरावर परिचित होऊ लागलेले आहेत. या खेळांमध्ये प्राविण्य मिळवणारे असंख्य खेळाडू आपल्या राज्यात आहेत. भविष्यात या अस्सल भारतीय खेळांना ऑलिम्पिक खेळांमध्ये स्थान मिळविण्यासाठी नक्कीच प्रयत्न करणार.

# मुंबईत संस्कारक्षम हेमोत्सव २०२६ चे भव्य आयोजन

## नोंद



हेमा फाँडेशन ही सामाजिक संस्था आर आर ग्लोबल द्वारा संचालित एक परोपकारी सामाजिक संस्था असून समाजात संस्कार, संस्कृती, सभ्यता आणि नैतिक मूल्यांच्या प्रचार प्रसारासाठी कार्यरत आहे. लोकांमध्ये मानवी नीती मुल्याबद्दल जागृती करणे हा हेमा फाऊंडेशन या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. याच अनुशंगाने दरवर्षी हेमोत्सव चे भव्य दिव्य आयोजन करण्यात येते.

महेंद्र काबरा यांच्या नेतृत्वाखाली तसेच जग प्रसिध्द मनो वैज्ञानिक आणि फिलिंग माइन्द्स चे संस्थापक तसेच हेमा फाऊंडेशनचे ट्रस्टी डॉ. चिनू अग्रवाल यांनी 'हेम वर्चूज,इ लर्निग पोर्टल'च्या माध्यमातून मूल्याधारित शिक्षणाचा व्यापक प्रमाणात प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य आजवर केलेले आहे. हे अभियान सध्या २६ राज्यातील जवळपास १५,५७४ शिक्षक आणि ४ लाख ९४ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचलेले आहे. वेबिनार आणि विविध प्रशिक्षण मित्रांच्या माध्यमातून ही शृंखला सातत्यपूर्ण संपूर्ण देशभर अखंडपणे सुरु आहे. या महत्वपूर्ण कार्यात डॉ . चिनू अग्रवाल ट्रस्टी आणि संशोधन प्रमुख यांचे हेमा फाऊंडेशनकृत कार्यात महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हेम व्हर्चुअल अंतर्गत संपूर्ण मूल्याधारित अभ्यासक्रमाची निर्मिती झालेली आहे. आणि संपूर्ण शिक्षण सामग्री त्यांच्याचद्वारे पोर्टलवर अपलोड केली गेली आहे. दरवर्षी हेमा फाऊंडेशनच्या स्थापना दिनाचे औचित्य साधूनच हेमोत्सवचे आयोजन करण्यात येते. यामध्ये हेमश्रि, हेम सारथी आणि हेम चॅम्पियन अशा पुरस्कारांचे वितरण केले जाते. ज्या समाजसेवकांनी सामूहिक रित्यामानवी मूल्यांची जपणूक, सुरक्षा, जिज्ञासा, संस्कृतीचा प्रसार, निसर्गप्रेम, पर्यावरण रक्षण,जल संरक्षण, राष्ट्र प्रेम अशा विविध सामाजिक कार्यात भरीव योगदान दिले आहे त्यांना हे पुरस्कार दिले जातात. यंदा २७ जून रोजी मुंबईतील दादर सभागृहात या हेमोत्सवचे आयोचजण करण्यात आले आहे.

## शब्दखेळ - ५८०

**खाली दिलेल्या चौकोनात भारतातील एका राज्याचे नाव लपलेले आहे शोधा पाहू**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | द | र | ळ | न | दे | ना | म |
| व | वि | क | त | बं | टो | ड | ण |
| ता | म | प | कि | या | न | नी | ता |
| दि | र | र्टा | ची | सु | के | र्डी | ज |
| बा | ना | रा | इ | ह | इ | या | श |
| रा | ढ | दे | पु | मं | थ | य | हि |
| म | म | ने | ट | जं | झु | क | ड |
| रा | त्त | मि | प्र | मा | ल | ण | डू |

**शब्दखेळ - ५७९ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| खा | क | व | ट | भे | वि | र | दा |
| कि | ग | पि | ग | आ | ता | ध | द |
| ण | ह | क | मी | ठ | ड | म | णा |
| म | गा | ळी | हि | त | रं | ल | ढा |
| वं | मा | थ | न | ल | श | र | डी |
| प | क | व | ळी | ज | श | र | डी |
| रू | ती | बा | बा | लो | वा | की | चु |
| न | भा | त्या | रा | मा | ळ | ड | न |

**उत्तर - खानदान**

# अमरावतीचे भक्ती धाम मंदिर

## चला पर्यटनाला



अमरावतीमधील बडनेरा रोडवर स्थित, भक्ति धाम मंदिर म्हणजे राधाकृष्ण यांना समर्पित असलेले मंदिर असून अमरावती जिल्ह्यातील लोकप्रिय तीर्थक्षेत्र आहे. मंदिराच्या मुख्य गर्भगृहात संगमरवरी दगडाने बनवलेली श्रीकृष्णाची राधा यांच्या सुंदर मूर्ती आहेत.

संत जलराम बाप्पाची (गुजरातमधील हिंदू संत) मूर्ती देखील मुख्य गाभाऱ्यात स्थापित केली गेली आहे. दरवर्षी हजारो भाविक या मंदिरास भेट देतात आणि सणांच्या वेळी मंदिराचे सौंदर्य खरोखरच एखाद्याला मंत्रमुग्ध करून टाकते.

मंदिराच्या मागील बाजूस मंदिर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या देखरेखीत एक उद्यान तयार केलेले आहे. मंदिरात तीर्थयात्रा झाल्यानंतर शांततेत कायाकल्प होण्यासाठी, उद्यानात एक शांत आणि आनंददायी वातावरण आहे जे सर्वशक्तीमान देवाशी पवित्र संबंध स्थापित करते. हे पार्क मुलांना खूप आवडते. हे मंदिर अमरावती रेल्वे स्थानकापासून काही किलोमीटर अंतरावर आहे.

लोकरंजन

संकलन-संयोजन
सुशीलकुमार
susheelkumar80@yahoo.com

### अहिल्यानगर ग्राहक पंचायतीची निवेदनाद्वारे मागणी

# स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात प्रवाशांना स्वच्छतागृहे मोफत उपलब्ध करावीत

**समाचार/नगर-दि.२६**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने काढलेल्या परिपत्रकानुसार महामंडळाच्या बस स्थानक परिसरातील सार्वजनिक शौचालये व स्नानगृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करणारे पत्र ग्राहक पंचायत, अहिल्यानगर शाखेतर्फे विभागीय कार्यालयाला देण्यात आले. विभागीय कार्यालयाचे डिव्हीजनल कंट्रोलर यांच्या वतीने डीटीओ कमलेश भारती यांनी हे पत्र स्वीकारले व पुढील कार्यवाहीची ग्वाही दिली.



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एका परिपत्रकाद्वारे १ जून, २०२६पासून राज्यातील महामार्गावरून धावणाऱ्या सर्व बसेस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटामध्ये २ रुपये स्वच्छता अधिभार लागू केला आहे या स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात महामंडळाच्या बसस्थानक परिसरातील स्वच्छता गृहे प्रवाशांना वापरता येणार आहेत असेही महामंडळाने जाहीर केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

मात्र या परिपत्रकाची अंमलबजावणी विविध बस स्थानकांमध्ये होत नसल्याचे ग्राहक पंचायतीच्या जिल्हाभरातील पदाधिकारी व सदस्यांना आढळले त्यानुसार स्थानिक पदाधिकाऱ्यांनी भारती यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. तसेच यापूर्वीचे स्वच्छता ठेकेदार यांनी अद्यापही ही स्वच्छतागृहे आपल्या अधिपत्याखाली ठेवली असून ते अनाधिकृतपणे प्रवाशांकडून स्वच्छतागृह वसणार गृह वापराबद्दल शुल्क आकारक आहेत तसेच यासंदर्भात एसटी महामंडळाच्या अधिकारांकडे तक्रार केली असता ते त्याची दखल घेत नसल्याचेही शिष्टमंडळाने त्यांना सांगितले याबाबत तत्काळ कारवाई व्हावी अशी मागणी दिलेल्या पत्राद्वारे त्यांनी केली.

प्रवाशांना अद्यापही या बदलाची जाणीव नसल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर या आशयाचे फलक दर्शनी भागात ठळक अक्षरात लावावे तसेच बस स्थानकावरील ध्वनिक्षेपकावरून झालेला हा बदल अर्थात बस स्थानक परिसरातील शौचालय व स्नानगृह प्रवाशांसाठी मोफत आहेत व त्यासाठी प्रवाशांनी कोणतेही शुल्क देऊ नये अशी सूचना दर पंधरा-वीस मिनिटांनी प्रसारित करावी अशी ही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर ग्राहक पंचायती अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, जिल्हा संघटक डॉ. प्रा. राजेंद्र कळमकर, जिल्हा सचिव सिद्धार्थ वाघमारे सहसचिव संजय जोशी सदस्य अजित कटारिया यांच्या सह्या आहेत. या निवेदनासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभागीय पदाधिकारी दत्तात्रेय शेळके, व अहिल्यानगरचे जिल्हा कोष प्रमुख कृष्णराव बागडे यांचे सहकार्य लाभले.



# सावेडी डॉक्टर असो.तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**समाचार/नगर-दि.२६**

दहावी हा जीवनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून शाळेच्या व आई-वडिलांच्या नावलौकिकात भर घातली आहे.या पुढील काळात डॉक्टर, वकील,इंजिनियर तसेच स्पर्धा परीक्षा देऊन पीएसआय, तहसीलदार,जिल्हाधिकारी असे अधिकारी बनण्याचे स्वप्न मुलांनी पहावे.विद्यार्थ्यांनी ध्येय ठेवून वाटचाल केल्यास जीवनात यशस्वी होतील.असे प्रतिपादन विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन यांनी केले

सावेडी येथे डॉक्टर्स असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने सावेडीतील दहावीच्या परीक्षेत मेरीट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ पार पाडला.याप्रसंगी प्रिसिजन डायग्नोस्टिकचे संचालक डॉ. रणजीत सत्रे,प्रमुख पाहुणे म्हणून विद्यादान अकॅडमीचे रोहित रामदिन,डॉ. अतुल नरसाळे डॉ.शरद ठुबे,डॉ. सुशील नेमाने आदींसह डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष भगवान कराळे,उपाध्यक्ष डॉ. सुनील सचिव डॉ.नितीन झावरे, खजिनदार डॉ.सुरेंद्र खन्ना,इशेश सर उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. रणजीत सत्रे म्हणाले,दरवर्षी सावेडी परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो.विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी तसेच पुढील शिक्षणासाठी त्यांना मार्गदर्शन करावे या उद्देशाने सावेडी डॉक्टर असोसिएशन व प्रिसिजन डायग्नोस्टिकच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन केले जाते. डॉ.योगिता सत्रे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगितले.

### कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून

# एकल महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य

**समाचार/नगर-दि.२६**

केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून एकल महिला सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे , अशी माहिती कौशल्य विकास समितीचे कार्यकारी सदस्य विनायक देशमुख यांनी दिली. राज्य शासनाने राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला असुन त्यादृष्टीने सर्व स्तरांवर कामाला सुरुवात झाली आहे.

नगर जिल्ह्यात पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या पुढाकाराने एकल महिला सक्षमीकरणासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एकल महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात आली असून त्यामाध्यमातून शासनाच्या विविध विभागांच्या योजनांमध्ये एकल महिलांना प्राधान्य दिले जात आहे. मागील वर्षी जिल्ह्यातील एक हजार पेक्षा जास्त एकल महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात आले. सध्या या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या असून प्रति महिना किमान दहा हजार ते कमाल एक लाख रुपये पर्यंत इतके अर्थार्जन करीत आहेत.



या आर्थिक वर्षाचा कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा निश्चित होत असुन या कार्यक्रमांतर्गत एकल महिलांना प्रशिक्षणात प्राधान्य दिले जाणार आहे. पालकमंत्री विखे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र व राज्य सरकारच्या कौशल्य विकास योजनांसह खाजगी आस्थापनांच्या सी.एस. आर. निधीतुन एकल महिलांना कायम स्वरुपी उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एकल महिलांनी एकल महिला सक्षमीकरण समितीशी संपर्क साधावा, असे आवाहन देशमुख यांनी केले आहे.

# आगरकर मळ्यातील पाणीटंचाईविरोधात नगरसेवकांसह नागरिकांचा महापालिकेत ठिय्या

**समाचार/नगर-दि.२६**

शहरातील प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत येणाऱ्या आगरकर मळा परिसरात गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाणीपुरवठा गंभीरपणे विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या प्रश्नीकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नगरसेविका गीतांजली काळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे आणि नगरसेवक सुजय मोहिते यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी महापालिका आयुक्तांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन केले.आंदोलनानंतर शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन परिसरातील पाणीपुरवठ्याच्या



समस्यांची सविस्तर माहिती दिली. यावेळी आयुक्तांनी संबंधित प्रश्नाची दखल घेत १५ दिवसांच्या आत तो मार्गी लावण्याचे आश्वागसन दिले. तसेच गजानन कॉलनी परिसरातील संपवेल येथे नवीन मोटार बसविण्यासाठी आवश्यीक निधी उपलब्ध करुन देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सुनिल काळे, माजी नगरसेवक विजय गव्हाळे, विजय गायकवाड, महेश सुपेकर, प्रसाद कुकडे, कल्पना भळगट, पूजा चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आगरकर मळा परिसरातील नागरिकांना सध्या अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने अनेक घरांपर्यंत पुरेशा प्रमाणात पाणी पोहोचत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. याशिवाय पाणी सोडण्याच्या वेळा पूर्णपणे अनियमित झाल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. कधी पहाटे तर कधी मध्यरात्रीनंतर पाणी सोडले जात असल्याने नागरिकांना रात्रभर जागून पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या कुटुंबांना या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.या प्रश्नाबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला असल्याचेही स्थानिक नगरसेवकांनी सांगितले. महापालिका प्रशासनाकडे यापूर्वीही अनेक वेळा निवेदने देण्यात आली होती. तसेच पंधरा दिवसांपूर्वीही प्रशासनाला परिस्थितीची कल्पना देण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस सुधारणा न झाल्याने नागरिकांच्या असंतोषात वाढ झाली.

# महापंचायत ॲप प्रकरणाची त्रिस्तरीय चौकशी करा- रोडे

**समाचार/नगर-दि.२६**

अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या पारनेर, श्रीगोंदा आणि नगर पंचायत समित्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. या प्रकरणाची त्रिस्तरीय समितीमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली असून यासंदर्भातील निवेदन




ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद प्रशासनाला सादर करण्यात आले आहे.निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या विविध डिजिटल प्रणाली उपलब्ध असतानाही संबंधित पंचायत समित्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना आवश्यचक सुरक्षा निकषांचे पालन केले नाही. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींचे कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि पेपरलेस करण्याचा उद्देश असताना, त्याऐवजी 'महापंचायत प' या खाजगी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला. या प्रक्रियेत नागरिकांची अत्यंत संवेदनशील माहिती खाजगी सर्व्हरवर अपलोड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांची आधारसदृश ओळखपत्रे, पॅनकार्ड, बँक खात्यांचे तपशील, घरगुती मालमत्तेची माहिती तसेच इतर वैयक्तिक कागदपत्रे कोणत्याही सुरक्षा हमीशिवाय खाजगी सर्व्हरवर साठविण्यात आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारे संवेदनशील माहितीचे व्यवस्थापन करणे हे नागरिकांच्या गोपनीयतेसाठी आणि डिजिटल सुरक्षेसाठी धोकादायक ठरू शकते, असा समितीचा दावा आहे.

# फसवणुकीच्या प्रकरणात महिलेस ६ महिने कैद

**समाचार/नगर-दि.२६**

उसनवारी रक्कम घेतलेल्या परत फेडीपोटी दिलेला धनादेश न वटल्याच्या फसवणुकीच्या खटल्यात महिलेस येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. ९ यांनी आरोपीस दोषी धरुन ६ महिने साधी कैद व रक्कम ७,८६,५०० नुकसान भरपाई पोटी फिर्यादीस देण्याची शिक्षा सुनावली.पद्माकर रमेश हरबा (रा. पाटील गल्ली, भिंगार) यांचेकडुन सन २०१५ मध्ये वैद्यकीय उपचारासाठी श्रीमती जमनाबाई मंगल परमार यांनी रक्कम ५,००,००० उसनवार घेतलेली होती. त्या बदल्यात नोटरी पब्लीक यांचेसमोर उसनवार पावती देखील लिहुन दिलेली होती. सदरची रक्कम फिर्यादीस १ ते सव्वा वर्षात परतफेड करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सदर मुदत उलटुन गेल्या

नंतरही त्यांनी सदर रक्कम परत केली नाही. त्यानंतर त्यांनी फिर्यादीस रक्कम ६०,००० रोख स्वरुपात दिले व राहिलेली रक्कम ४,४०,००० चा धनादेश फिर्यादीस दिला. सदरचा धनादेश स्टॉप पेमेंट केल्यामुळे न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी यांनी येथील न्यायालयात इं. पि. को. कलम ४२० अन्वये फौजदारी खटला दाखल केला. फिर्यादी यांचेतर्फे डव्होकेट रमेश अ. जोशी यांनी काम पाहिले त्यांना ॲड. दिपाली झांबरे व ॲड. राजस करमरकर यांनी सहकार्य केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालकांची मोफत आरोग्य तपासणी; ५५ बालकांची मोफत तपासणी

**समाचार/नगर-दि.२६**

लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वीत असून, तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम सेवा देत आहे. २६ बेडच्या अद्यावत एनआयसीयू विभागात नवजात बाळाच्या विविध आजारावर सर्व अद्यावत सेवा उपलब्ध असून, हे सेंटर जिल्ह्यातील बालकांसाठी संजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. गुट्टे बोलत होते. यावेळी संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, डॉ. प्रकाश कांकरिया, बाबुशेठ लोढा, अभय गुगळे, माणकशेठ कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ. आशिष भंडारी, पेडियाट्रीक



सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल, डॉ. लिझा बलसारा आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. गुट्टे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस. (श्वासनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार, जन्मजात आजारांचे निदान व उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब व डायलिसिस मशीन द्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

बालरोग तज्ञ डॉ. वैभवी वंजारे म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या माध्यमातून नवजात बालकांपासून लहान मुलांच्या सर्व शस्त्रक्रिया यशस्वी केल्या जात आहे. प्रदीर्घ अनुभवी डॉक्टर पूर्णवेळ हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. डॉ. दिपी अग्रवाल यांनी देखील हॉस्पिटल मधील विविध अद्यावत सोयी-सुविधांची यावेळी माहिती दिली.

प्रास्ताविकात डॉ. आशिष भंडारी यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नवजात बालकांपासून ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विविध आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. या शिबिरात ५५ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबीरातील गरजू बालकांवर सवलतीच्या दरात सरकमसीजन (सुंता), हायड्रोसिल, पेंडिक्स, जांघेचा हर्निया, बेंबीचा हर्निया या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# भाजपचे सुनील रामदासी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

**समाचार/नगर-दि.२६**


हिंद सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील रामदासी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.या प्रसंगी माजी उपमहापौर दीपक सूळ, नगरसेवक महेश तवले, माजी नगरसेवक सुरेश तिवारी, संतोष सूर्यवंशी, आनंद पुंड, कैलास शिंदे, किरण पिसोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, ज्येष्ठांचे अनुभव, कार्याची शिदोरी आणि त्यांनी आयुष्यभर जोपासलेले मूल्याधिष्ठित विचार समाजाला ऊर्जा, प्रेरणा आणि योग्य दिशा देणारे असतात. प्रत्येक



पिढीला ज्येष्ठांच्या अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, सुनील रामदासी यांनी आपल्या कार्यकाळात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत समाजात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. विविध क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली असून समाजहितासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना आनंद होत असल्याचेही आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही सुनील रामदासी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या निरोगी, दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला.



शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी भेट दिली असता त्यांच्या हस्ते गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी देवस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर ,भाजपचे शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे आदींसह नगरसेवक पदाधिकारी उपस्थित होते. (छाया : राजू खरपुडे, नगर.)

# ‘फिरोदिया’च्या गुंजनला दहावीत १०० टक्के गुण



**समाचार/नगर-दि.२६**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलची विद्यार्थिनी गुंजन महेश गोले हिने दहावीच्या परीक्षेत अखेर शंभर टक्के गुण प्राप्त करूननवा विक्रम प्रस्थापित केला आहे. प्रारंभी ९९.४० टक्के गुण मिळाल्यानंतर फोटो कॉपी तपासणी व पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये वाढ होत अखेर तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले. या यशामुळे ती अहिल्यानगर जिल्ह्यात शंभर टक्के गुण मिळवणारी एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे.

गुंजनच्या या अभूतपूर्व यशाबद्दल अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेच्या प्रमुख छायाताई फिरोदिया यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला.

यावेळी संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी, मुख्याध्यापक कैलास साबळे, महेश वसंत गोले, अंजली गोले, प्रमोद गांधी आदी उपस्थित होते.

दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुंजनला ९९.४० टक्के गुण मिळाले होते. गुणवाढीची शक्यता लक्षात घेऊन उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मागविण्यात आल्या. त्यानंतर झालेल्या तपासणीत तिचे गुण वाढून ९९.८० टक्क्यांवर पोहोचले. मात्र, यानंतरही तिच्या पालकांनी संबंधित विषयांच्या गुणांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेनंतर तिच्या गुणांमध्ये आणखी वाढ होऊन तिला १०० टक्के गुण मिळाल्याचे नुकतेच कळविण्यात आले.

पुणे विभागातून यंदा सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. या सर्व विद्यार्थ्यांमधून केवळ बारा विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळविण्याचा मान मिळाला आहे. त्यामध्ये गुंजन गोलेचा समावेश असून, तिच्या या यशामुळे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा शैक्षणिक सन्मान उंचावला आहे.

गुंजनच्या यशामागे तिची जिद्द, कष्ट, कुटुंबाचे आणि शिक्षकांचे मोठे योगदान असल्याचे स्पष्ट करुन छायाताई फिरोदिया यांनी तिचे विशेष कौतुक केले. तिचे वडील महेश गोले हे व्हीआरडीईमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत आहेत, तर आई अंजली गोले या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये शिक्षिका आहेत.

गुंजनच्या या यशाबद्दल संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, विश्वास्त ॲड. गौरव मिरीकर यांच्यासह विश्वस्त मंडळातील सदस्यांनी तिचे अभिनंदन केले.

तसेच भविष्यातील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ‘संगीताची सरस्वती’ विषयावर रविवारी व्याख्यान




**समाचार/नगर-दि.२६**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमीच्या वतीने लता मंगेशकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर आधारित विशेष व्याख्यान आणि तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. २८ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता नालेगाव येथील श्री मार्कंडेय संकुल, अमरधाम रोड, दातरंगे मळा येथे होणार आहे.

या कार्यक्रमात लता मंगेशकर, संगीताची सरस्वती’ या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक कस्तुरी मुरलीकृष्ण यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, लता मंगेशकर यांच्या संगीत कारकिर्दीचा, त्यांच्या संगीतातील योगदानाचा तसेच भारतीय संगीतविश्वावर त्यांनी उमटविलेल्या अमिट ठशाचा सखोल आढावा ते उपस्थितांसमोर तेलगु भाषेत मांडणार आहेत. याशिवाय तेलुगू संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात येणार आहेत. या मध्ये भरतनाट्यम, बतकम्मा, कोलालू आणि मंगळा गौर या कला सादर होणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

कार्यक्रमाचे समन्वयक अशोक कंटे यांनी सांगितले की, भारतरत्न लता मंगेशकर यांचे कार्य हे केवळ संगीत क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू जाणून घेण्याची ही सुवर्णसंधी आहे. तसेच तेलुगू संस्कृतीची समृद्ध परंपरा अनुभवण्याची संधीही या कार्यक्रमातून मिळणार आहे. तेलुगू भाषेतील व तेलुगू समाजातील साहित्य, संगीत आणि संस्कृतीप्रेमी नागरिकांनी तसेच तेलुगू समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुरेखा कोडम यांनी केले आहे.

## डॉ.रुपाली कुलकर्णी यांना संगीत विशारद पदवी

# श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांचे संगीत परीक्षांमध्ये उज्वल यश



**समाचार/नगर-दि.२६**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या एप्रिल २०२६ च्या संगीत परीक्षेत श्रुती संगीत निकेतनच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. अहिल्यानगर केंद्रात सुप्रिया जाधव, अनुप्रिता सोनवणे, वरद कुलकर्णी, अन्वय परदेशी, स्वराली गवारे, रेणुका कुलकर्णी, आर्या कुलकर्णी, ऋतुजा कालिया, डॉ.रुपाली कुलकर्णी हे विद्यार्थी विविध परीक्षांमध्ये गायनात व हार्मोनियम वादनात केंद्रात प्रथम आले आहेत. डॉ.रुपाली कुलकर्णी यांनी प्रथम श्रेणीसह संगीत विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. सर्व विद्यार्थ्यांना प्रतीक्षा काळे, डॉ.धनश्री खरवंडीकर आणि मकरंद खरवंडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

**परीक्षा निहाय निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रारंभिक** – अवनी आघाव, पूनम आगरकर, श्रेया खासगीवाले, सुप्रिया जाधव, देवांशी सोनवणे, अनुप्रिता सोनवणे, ऋतुजा साळुंके, **प्रवेशिका प्रथम** – अन्वय परदेशी, शराली काळे, रोहिणी कुऱ्हाडे, मनिषा तळेकर, आरोही दगडे, तन्मय पडोळे, शांभवी साखला, वरद कुलकर्णी, सोहम सूर्यपुजारी, मैत्रेयी ढवण, श्रीकर ढवण, उर्वी जोशी, वसुधा म्हस्के, **प्रवेशिका पूर्ण** – कृष्णा खराडे, भार्गवी परदेशी, सई मुळे, गिरीश दैतुल, स्वराली गवारे, स्वरा चाकूरकर, प्रगल्भ जोशी, रोहित तांबोळी, अनुश्री तळेकर, कृष्णा साखला, **मध्यमा प्रथम** – रेणुका कुलकर्णी, साक्षी दराडे, **मध्यमा पूर्ण** – स्वराली जोशी, आर्या कुलकर्णी, **विशारद प्रथम** – ऋतुजा कालिया, **विशारद पूर्ण** – डॉ.रुपाली कुलकर्णी


**ड्रायव्हर पाहिजे**

घरगुती गाडी चालविण्यासाठी अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

सायंकाळी ६ नंतर संपर्क करणे

* संपर्क *

7709011074

**घर विकणे आहे**

६ रूमचे दुमजली घर विकणे आहे. पाईपलाईन रोड, एकवीरा चौक, सिटी प्राईड हॉटेल समोर, तुळजाभवानीनगर, सावेडी, अहिल्यानगर

– संपर्क –

8888655620

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या

**स्त्रियांच्या समस्या**

- मासिक पाळीच्या तक्रारी
- अंगावरून पांढरे जाणे
- गर्भ न रहाणे
- वारंवार गर्भपात होणे
- गर्भाशयात गाठी
- गर्भाशयाचा कर्करोग
- स्तनांची वाढ न होणे
- स्तनातून दूध न येणे
- स्तनात गाठी
- स्तनाचा कर्करोग
- योनी मार्गाची दुर्गंधी
- गुप्त अंगाला खाज
- विविध त्वचा विकार
- गुप्तरोग, गर्मी
- लघवीला जळजळ
- संभोगात रस न येणे
- संभोगा विषयीची भीती
- हस्तमैंथूनाची सवय
- लैंगिक विकृती
- मानसिक नैराश्य

डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
(३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)

1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त

डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर

www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)

स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर

9011020176, 9011026483, 7499980845

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि. २०/०६/२०२६ ते दि.२५/०६/२०२६

| | |
|---|---|
| COCKTAIL-2 (हिंदी) | |
| 08.15 AM | 09.00 AM |
| 10.00 AM | 12.00 PM |
| 01.00 PM | 03.00 PM |
| 04.00 PM | 06.00 PM |
| 07.00 PM | 09.00 PM |
| 10.00 PM | |
| TOY STORY 5 (3D) (हिंदी) | |
| 02.35 PM | 08.00 PM |
| MAIN VAAPS AAUNGA (हिंदी) | |
| 02.00 M | |
| HAUNTED ECHOES (हिंदी) | |
| 11.20 AM | |
| कप बशी (मराठी) | |
| 05.05 PM | |
| घबाडकुंड (मराठी) | |
| 10.35 PM | |
| तुंबाडची मंजुळा (मराठी) | |
| 07.50 PM | |
| देऊळ बंद -२ (मराठी) | |
| 11.15 AM | 04.35 PM |
| 10.00 PM | |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show | CONNPLEX | AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

m डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

ऑनलाईन एअर व रेल्वे तिकिट.
देश-विदेशातील हॉटेल बुकींग.
पासपोर्ट व व्हिसा, फॉरेन करन्सी (मार्ग).
सर्व न्यूज पेपर व चॅनल जाहिराती.
देश-विदेशातील टुर्स बुकींग.
केसरी सहलींचे बुकींग
स्वतंत्र, हनिमून, यात्रा, छोटा ग्रुप सहलींचे आयोजन.
स्टार व केअर प्लस हेल्थ व फ्युचर लाईफ इन्शुरन्स

KESARI | CHAITANYA TRAVELS

२३ वर्षांची पर्यटन परंपरा
चैतन्य ट्रॅव्हल्स् ®
पब्लिसिटी व इन्शुरन्स
संचालक - पत्रकार किशोर मरकड
रेनबो हाऊस, सावेडी रोड, अ.नगर.
9422222431 / 9552533331

